संदर्भः- १) महाराष्ट्र सुधारणा आदेश क्र ४१/२०११ दिनांक २८/११/२०११
२) शासन निर्णय क्रमांक २०१२/३०/प्र.क्र-१८ (पुबा) (१९८/११)मु-१ दिनांक १५/०३/२०१३
३) महाराष्ट्र मुद्रांक शुल्काचा ई-भरणा व परतावा नियम, २०१३ दि. २४/०७/२०१३
४) या कार्यालयाचे परिपत्रक क्र. का५/मुद्रांक-११/ प्र,क्र७०/०४/२२५/११ दि.२३/०२/२०११
५) या कार्यालयाचे परिपत्रक क्र. का५/मुद्रांक-११/ प्र,क्र७०/GRAS/०४/१०७४/११दि.०४/०८/२०११
६) या कार्यालयाचे परिपत्रक क्र. का५/मुद्रांक-११/ प्र,क्र४३/GRAS/०४/११६९/११ दि.२३/०८/२०११

---

क्र.का५/ई-पेमेंट/ई-एसबीटीआर/प्र.क
नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक,
महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे कार्यालय, पुणे,
नविन प्रशासकीय इमारत, तळमजला,
पुणे - ४११००१.
दिनांक- ०६/ १० /२०१३.

# परिपत्रक

**विषय :- मुद्रांक शुल्क, नोंदणी फी, व इतर रक्कमांचे प्रदान ई-भरणा / ई-एसबीटीआरव्दारे ग्रास (GRAS) च्या माध्यमातून करण्याबाबत...**

**प्रस्तावनाः-**

मुंबई मुद्रांक अधिनियम १९५८ अन्वये देय मुद्रांक शुल्काचे प्रदान करण्यासाठी सध्या कागदी मुद्रांक, फ्रॅकिंग, चलन अशा विविध पध्दती प्रचलीत आहेत. तथापी सदर पध्दतीच्या काही मर्यादा/ सुरक्षाविषयक उणिवा कालानुरूप निदर्शनास आलेल्या आहेत. ई-स्टॅम्प्स पध्दतीच्या अंमलबजावणीसाठी नियुक्त करण्यात आलेल्या स्टॉक होल्डिंग कॉर्पोरेशन ऑफ इंडिया या कंपनी बरोबरचा करार दिनांक ३१/०७/२०१३ रोजी संपुष्टात आला असुन दिनांक १/०८/२०१३ पासून ई-स्टॅम्प्स ही मुद्रांक शुल्क प्रदानाची पध्दत बंद करण्यात आली आहे.

वरील सर्व बाबीचा एकत्रित विचार करुन तसेच उपलब्ध ई-पेमेंट (e-payment) या आधुनिक तंत्रज्ञानाचा उपयोग करुन अधिक सुरक्षित, गतीमान, लोकाभिमुख आणि पडताळणीसाठी सोईस्कर अशी ई-भरणा पध्दत विकसीत करण्यात आली आहे. या पध्दतीचे विनियमन करणारे "महाराष्ट्र मुद्रांक शुल्काचा ई-भरणा व परतावा नियम, २०१३" शासन स्तरावरुन दिनांक २४/७/२०१३ रोजी अधिसूचीत करण्यात आले आहेत.

**अत्यंत महत्वाचे :- चलन विरूपित करण्यासंबधी सुचना क्र ५.२ पहावी.**

(१) **महत्वाच्या व्याख्या :-**

(१.१) **"प्राधिकृत सहभागी बँक"** (Authorised participating Bank) म्हणजेच मुद्रांक शुल्क, नोंदणी फी व इतर रकमा, आभासी कोषागारामध्ये भरण्यासाठी आणि अशा भरणा रकमेची साधी पावती अथवा ई-सुरक्षित बँक तथा कोषागार पावती देण्यासाठी, मुख्य नियंत्रक महसूल प्राधिकारी यांनी नियुक्त केलेली सहभागी बँक.

(१.२) **"सिन"** (CIN) ( Challan Identification Number) म्हणजे ग्राहकाकडुन भरणा रक्कम प्राप्त झाल्यावर प्राधिकृत सहभागी बँकेने दिलेला "चलन ओळख क्रमांक".

(१.३) **"ई-एसबीटीआर"** (e-SBTR) (Electronic Secured Bank and Treasury Receipt ) म्हणजे आभासी कोषागारात रकमेचा भरणा झाल्यानंतर प्राधिकृत सहभागी बँकेचे अधिका-यांनी शासनाच्या विशेष सामुग्रीवर मुद्रीत करुन दिलेली "ई- सुरक्षित ( प्रतिभूती ) बँक तथा कोषागार पावती".

(१.४) **"शासकिय जमा व लेखा प्रणाली (ग्रास)"** (G.R.A.S.) (Government Receipt and Accounting System) म्हणजे आभासी कोषागाराने रक्कम स्विकारण्यासाठी व त्याचा लेखा ठेवण्यासाठी उपयोगात आणलेली प्रणाली.

(१.५) **"जी.आर.एन."** (G.R.N.) ( Government Reference Number) म्हणजे भरणा रक्कम जमा झाल्यानंतर आभासी कोषागाराच्या प्रणालीव्दारे निर्मित **"**शासन संदर्भ क्रमांक**"**.

(१.६) **"ई-भरणा पावती"** ( Receipt of e-payment) म्हणजे आभासी कोषागारात झालेल्या मुद्रांक शुल्क भरणा रकमेचा, संलेखाशी संबंधित पक्षकाराचे नाव असलेले, शासन संदर्भ क्रमांक व चलन ओळख क्रमांक नमुद असणारे या करिता विहीत नमुन्यातील **"ई-चलन"**.

(१.७) **"साधी पावती"** (Simple Receipt) म्हणजे आभासी कोषागारामध्ये मुद्रांक शुल्क, नोंदणी फी व इतर रकमेचा भरणा केल्यावर, प्राधिकृत सहभागी बँकेने अथवा पक्षकाराने साध्या कागदावर मुद्रीत केलेली पावती. **तसेच शुल्क भरलेल्या व्यवहाराचा संपुर्ण तपशील नमुद केला आहे अशी पावती.** परंतू ई-भरणा नियमातील नियम ७ मधील केलेला भरणा हा साधी पावती मध्ये मोडणार नाही. तसेच याबाबतीत आणखी स्पष्ट करण्यात येते कि साधी पावती साठी प्रधिकृत सहभागी बँकांच्या वेबसाईटचा वापर करुन मुद्रांक शुल्क व नोंदणी फी ही दोन्ही प्रदाने एकाच वेळी करता येतील.

(१.८) **"मुद्रांक शुल्क भरणारा"** (Stamp Duty Payer) म्हणजे संबंधित संलेखामधील पक्षकार असलेली मुद्रांक शुल्काचा भरणा करणारी कोणतीही व्यक्ती.

(१.९) **"आभासी कोषागार "** (Virtual Treasury) म्हणजे महाराष्ट्र कोषागार नियम १९६८ मधील नियम २ चा खंड (एन) मध्ये व्याख्या केल्याप्रमाणे (ऑन लाइन भरणा विषयक बाबी हाताळण्यासाठी काळजी घेणारी कायद्याने स्थापित केलेली प्रणाली.)

**(२) ई-भरणा (ई-पेमेंट) पध्दतीचे फायदे :-**

ई-भरणा (ई-पेमेट) साधी पावती व ई-एसबीटीआर या दोन पध्दतीने शुल्क अदा करता येईल.

**साधी पावती व ई-एसबीटीआर या दोन पध्दतीचे समान फायदे खालील प्रमाणे आहेत :-**

(२.१) शासनाचा महसूल तात्काळ व सुरक्षितपणे शासन कोषागारात जमा होणार आहे. यामध्ये मान्यता प्राप्त बॅकांचा समावेश असल्याने **राज्याच्या कानाकोप-यापर्यंत** मुद्रांक शुल्क, नोंदणी फी व इतर रकमा वसुल करण्याची यंत्रणा उभी करणे शक्य आहे. त्यामुळे मुद्रांकाची टंचाई ही समस्या समुळ नष्ट होईल.

(२.२) ई-भरणा पध्दतीने **केव्हाही व कोठूनही (24 X 7) स्वतः देखील** ग्रास प्रणालीच्या माध्यमातून **अथवा शासनाने प्राधिकृत केलेल्या बॅकांव्दारे तसेच विक्रेत्यांव्दारे** मुद्रांक शुल्क, नोंदणी फी अथवा इतर रकमांचा भरणा शासनास जमा करता येऊ शकतो.

(२.३) ई-भरणा पध्दतीमधील साधी पावती व ई-एसबीटीआर या दोन्ही पध्दती व्दारे **मुद्रांक शुल्क व नोंदणी फी या दोन्ही प्रदानांचा भरणा एकाच वेळी एकत्रित करता येईल.** तसेच इतर रकमांचा भरणा करता येऊ शकतो.

(२.४) ई-भरणा व्दारे कोणत्याही संलेखासाठी आवश्यक असलेली **मुद्रांक शुल्क, नोंदणी फी व इतर शुल्काची नेमकी रक्कम (Exact amount) भरणे शक्य आहे.**

(२.५) सध्या प्रचलित असलेल्या सर्व पध्दतीपेक्षा या पध्दतीव्दारे भरणा **सुलभ, सुरक्षित व जलदरित्या करता येतो.**

(२.६) उपरोक्त प्रणालीव्दारे शासनाकडे जमा होणा-या रकमेचा महालेखापाल कार्यालया बरोबर तसेच इतर सर्व कार्यालया बरोबर जमा ताळमेळ करणे सुलभ होणार आहे.

(२.७) जमा रकमांच्या संशोधनासाठी व विश्लेषणासाठी आवश्यक माहिती कोणत्याही क्षणी या प्रणालीव्दारे तात्काळ प्राप्त होणार आहे.

(२.८) या पध्दतीचे प्रमुख वैशिष्ठ असे की, ई-भरणा पध्दतीमध्ये भरलेला मुद्रांक शुल्क रकमेचा परतावा देण्यासाठी वजावटीची रक्कम ही **मुद्रांक शुल्काच्या १%, कमीत कमी रू.२०० व जास्तीत जास्त रू. १०००/-** या मर्यादेच्या अधिन राहिल. परंपरागत परतावा पध्दतीमध्ये वजावटीची रक्कम जी १०% इतकी आहे, त्याच्याशी तुलना करता वरील वजावट खूपच कमी आहे.

**ई-एस.बीटीआर प्रणालीचे फायदे :-**

(२.९) ई-एस.बीटीआर चा कागद हा परंपरागत मुद्रांक कागद सदृश्य आहे.

(२.१०) ई-एसबीटीआर साठीचे लेखन साहित्य ( स्टेशनरी ) चा पुरवठा हा भारत प्रतीभूती मुद्रणालय, नाशिक यांचे मार्फत प्रधान मुद्रांक कार्यालय मुबंई यांना व त्यांचे कडून प्राधिकृत सहभागी बँकांना करण्यात येईल व बँकांच्या शाखा मार्फत प्रत्यक्ष वापर कर्त्याला पुरविण्यात येईल.

**(३) साधी पावती व ई-एसबीटीआर यांची प्रमुख वैशिष्ट्ये / फरक खालील प्रमाणे आहेत :-**

| अ.क्र | साधी पावती | ई-एसबीटीआर (e-SBTR) |
|---|---|---|
| १ | साध्या कागदावर प्रिंट होईल | सुरक्षा वैशिष्ट्यांनी युक्त (पारंपारिक मुद्रांक सदृश्य ) स्टेशनरीवर प्रिंट होईल. |
| २ | प्रदान कर्त्यास स्वतः प्रिंट घेता येईल किंवा बॅकेच्या कांऊंटरवर पैसे भरून प्रिंट घेता येईल. | फक्त प्राधिकृत सहभागी बँका प्रिंट करून देऊ शकतील. |
| ३ | **जे दस्त नोंदणी करणे अनिवार्य आहेत, त्या दस्तासाठीच** मुद्रांक शुल्क व कोणत्याही दस्ताचे नोंदणी फी तसेच इतर रकमांचा भरणा करता येईल. | जे दस्त नोंदविणे कायद्याने अनिवार्य आहेत असे दस्त, तसेच जे दस्त नोंदविणे कायद्याने वैकल्पिक आहेत, अशा कोणत्याही दस्ताचे रू.५०००/- व त्यापेक्षा जास्तीचे मुद्रांक शुल्क भरता येईल. |
| ४ | नोंदणी करावयाच्या दस्तास मुद्रांक शुल्काबरोबरच नोंदणी फी व इतर रकमांचा भरणा एकत्रितपणे करता येईल. तसेच केवळ नोंदणी फी देखील स्वतंत्र्यरित्या भरता येईल. | नोंदणी करावयाच्या दस्तास मुद्रांक शुल्का बरोबरच नोंदणी फी व इतर रकमांचा भरणा सुध्दा अदा करता येईल. मात्र केवळ नोंदणी फी स्वतंत्र्यरित्या भरता येणार नाही. |
| ५ | या मध्ये प्रदानकर्ता स्वतः प्रिंन्ट घेऊन व स्वतः साक्षांकन करून दस्त नोंदणीसाठी वापरू शकेल. | फक्त प्राधिकृत केलेल्या बॅकेमार्फतच या बाबतची प्रिंन्ट घेण्यात येईल व त्यावर बॅकेचा अधिकारी स्वाक्षरी करेल. |
| ६ | या व्दारे मुद्रांक शुल्क, नोंदणी फी व इतर रकमांचा भरणा **ऑन लाईन पध्दतीने केल्यास कोणत्याही रकमे साठी** करता येईल व **काऊंटर पध्दतीने भरणा केल्यास रू. ३००/-** व त्या वरील रकमेसाठीच करता येईल. | या व्दारे मुद्रांक शुल्काचा भरणा **रू.५०००/- व त्या वरील** रकमांसाठी करता येईल. |

**(४) ई- भरणा पध्दतीने भरणा करावयाची कार्यपध्दती :-**

(४.१) सदर प्रणाली मध्ये साधी पावती आणि ई-एसबीटीआर असे दोन पर्याय उपलब्ध आहेत. ही सेवा महाराष्ट्र शासनाच्या आभासी कोषागाराशी (Virtual Treasury) संलग्न असलेल्या बँकाव्दारे उपलब्ध राहिल.

(४.२) साधी पावती मिळण्याच्या दोन पध्दती आहेत:-

१) ऑनलाईन

२) बँक काउंटरव्दारे (OTC-Over the Counter)

**(४.२.१) ऑन लाईन ई-भरणा (ई-पेमेंट) पध्दत :-** (जोड तक्ता क्र-I व II प्रमाणे)

सर्व प्रथम GRAS (ग्रास ) प्रणालीसाठी https://gras.mahakosh.gov.in या संकेतस्थळावर भेट द्यावी किंवा मान्यताप्राप्त १५ बॅकाच्या संकेतस्थळापैकी सोईस्कर असलेल्या बँकेच्या संकेतस्थळावर (संबधित बँकेने सुविधा उपलब्ध करून दिली असल्यास) भेट द्यावी. त्या नंतर मुद्रांक शुल्क प्रदानाचा न्यायिक किंवा न्ययिकेतर हा प्रकार निवडावा. न्यायिक मुद्रांकासाठी संबंधित उच्च न्यायालयाची किंवा जिल्हा न्यायालयाची निवड करावी. न्यायिकेतर मुद्रांका करीता मुंबईसाठी अपर मुद्रांक नियंत्रक, मुंबई (मुद्रांक अधिक्षक) व मुंबई व्यतिरिक्त क्षेत्रासाठी नोंदणी महानिरीक्षक या पर्यायाची निवड करावी. न्यायिकेतर मुद्रांकाचे प्रदान करण्यासाठी ग्राहकाव्दारे प्रदान (Customer Payment) हा पर्याय निवडावा व प्रदान करावयाची नेमकी रक्कम नमूद करावी. या नंतर दस्त नोंदणी करावयाच्या कार्यालयाचे नाव (सामाईक कार्यक्षेत्राचे बाबत संबंधित पक्षकारास सोईस्कर असलेल्या कोणत्याही एका दुय्यम निबंधक कार्यालयाचे नाव) जिल्हा, आर्थिक वर्ष, प्रदान कर्त्याचे नाव, समोरच्या पक्षकाराचे नाव व मिळकतीचे संपूर्ण वर्णन त्यात नमूद करावे. बँकेची निवड केल्यानंतर प्रारूप चलन दिसेल, त्यातील माहिती तपासावी. जर त्या मध्ये काही चुक आढळून आल्यास तशी चलनामध्ये दुरूस्ती करावी किंवा सदरचे प्रारूप चलन शासनास शुल्क प्रदान करण्यापूर्वी रद्द करता येईल.

प्रारूप चलनामध्ये भरलेला तपशिल बरोबर असल्यास शासनास शुल्क प्रदान करण्याची कार्यवाही करावी. संबंधित शुल्क प्रदान केल्यावर शासकीय संदर्भ क्रमांक (GRN) दिसेल. सदर क्रमांकाची नोंद ठेवावी अशा प्रकारे शुल्काचे यशस्वी प्रदान नेट बँकिंग/डेबिटकार्ड किंवा एनईएफटी (NEFT) (प्रस्तावित) व्दारे झाल्यावर ई-चलनाची छापील प्रत घ्यावी. सदरच्या ई-चलनाची प्रतही दस्ताच्या प्रथम पृष्ठावर चिटकविल्यानंतर त्यास साधी पावती असे संबोधण्यात येईल.

(चुकीची माहिती भरल्या गेल्यास किंवा चुकीचा भरणा केला गेल्यास मुद्रांक शुल्क परतावासाठीच्या पध्दतीचा अवलंब करावा लागेल याची कृपया नोंद घ्यावी).

**(४.२.२) बॅंक काऊंटरवर ऑफ लाईन पध्दतीने ई- भरणा करण्याची पध्दत :-**

**१) ग्रास प्रणाली व्दारेः-** (जोड पत्र क्र. III प्रमाणे)

जर प्रदानकर्ता प्रदान करावयाचे शुल्क बॅंकेच्या काऊंटरवर भरणार असल्यास संबंधित बॅंकेकडून आवश्यक असलेला माहितीचा अर्ज स्वतः भरू शकेल किंवा MKCL ( महाराष्ट्र ज्ञान महामंडळ मर्यादितच्या प्राधिकृत केंद्रा मार्फत ) भरू शकेल. या साठी रू. ७ इतका सेवा शुल्क MKCL मार्फत आकारण्यात येईल. तसेच सायबर कॅफे / इंटरनेट कॅफे मधुन सुध्दा ग्रास प्रणालीच्या संकेतस्थळावर जाऊन अर्जदाराची संपूर्ण माहिती भरून घेता येऊ शकते. अशी माहिती भरल्यानंतर ग्रास प्रणाली मार्फत जी.आर.एन. क्रमांक दिसेल. सदर जी.आर.एन. क्रमांकाची नोंद ठेवावी. त्या नंतर प्रारूप चलन तयार होईल. सदर प्रारूप चलनाची प्रिन्ट घेऊन ते बॅंक काऊंटरवर सादर करता येईल. सदर बॅंक प्रारूप चलनाच्या आधारे संबंधित चलन धारकाकडून रोखीने/धनादेश, धनाकर्ष च्या स्वरूपात पैसे स्विकारून, शासन जमा करेल. त्यानंतर शुल्क शासन जमा झाल्यानंतर त्या चलनास चलन ओळख क्रमांक (CIN) मिळेल. सदर अंतिम इ-चलनाची प्रिन्ट घेण्यात येईल व ती संबंधित पक्षकारास बॅंकेचा शिक्का मारून देईल व वापर कर्त्याने नोंदविण्याच्या दस्ताच्या प्रथम पृष्ठावर प्रत चिटकवून नोंदणी साठी सादर करता येईल.

**२) बॅंकेच्या संकेत स्थळाव्दारे :-** ( जोडपत्र क्रमांक-IV प्रमाणे )

पक्षकार संबंधित बॅंकेच्या शाखेत जाऊन आवश्यक असलेल्या माहितीचा अर्ज तेथे भरून देऊ शकेल किंवा त्या बॅंकेच्या संकेतस्थळावर जाऊन देखिल माहिती भरता येईल. भरलेली माहिती अचूक असल्याची खात्री झाल्यास ती कायम करावी लागेल. त्या नंतर चलन ओळख क्रमांकासह प्रारूप साधी पावती तयार होईल. सदर पावतीची प्रिन्ट घेऊन अर्जदार संबंधित बॅंकेच्या शाखेत जाऊन रोखीने, धनादेश किंवा धनाकर्षाने रक्कम अदा करेल. बॅंकेच्या अधिका-याने सदर प्रणाली मार्फत शासनास रक्कम अदा केल्यावर शासन संदर्भ क्रमांक (GRN) देण्यात येऊन अंतिम साधी पावती तयार होईल. सदर साधी पावतीची प्रिंन्ट दस्ताच्या प्रथम पृष्ठावर चिटकविणे आवश्यक आहे.

**(४.३) ई-एसबीटीआर (e-SBTR) प्राप्त करुन घेण्यासाठी कार्यपध्दती :-**

ई-एसबीटीआर हा नेहमीच बॅंकेच्या काउंटरव्दारेच मिळु शकेल. तथापि ई-एसबीटीआर प्राप्त करण्यासाठी शुल्काचा भरणा ऑन लाईन किंवा बॅंक काउंटरव्दारे करता येईल.

**(४.३.१) ई-एसबीटीआर करीता ऑन लाईन भरणा करण्याची पध्दत :-** (जोड तक्ता क्र.V प्रमाणे )

सर्व प्रथम बॅंकेच्या वेबसाईटला भेट दिल्यानंतर (उदा. https://etax.idbibank.co.in/IGR) ईएसबीटीआर (e-SBTR) संबंधी बॅंक तपशीलामध्ये उपलब्ध असलेल्या ऑनलाईन अर्जामध्ये संपूर्ण माहिती जसे जिल्हा, नोंदणी कार्यालयाचे नाव, आर्थिक वर्ष, मुद्रांक शुल्क व नोंदणी शुल्काची माहीती भरावी. तसेच शुल्क प्रदान कर्त्याचे संपूर्ण नाव व प्रदान कर्त्याचे भ्रमणध्वनी क्रमांक नमुद करावा. दस्तातील दुस-या पक्षकाराचे नाव व इतर तपशील नमुद करावा. **दस्तातील विषयवस्तु असलेल्या** संपूर्ण मालमत्तेचे वर्णन तसेच कोणत्या अनुच्छेदानुसार दस्ताची नोंदणी करणार आहे त्या बाबतची माहिती, प्रत्यक्ष किंमत व अदा केलेला

मोबदला इ. संपूर्ण माहीती भरावी. तसेच भरलेला तपशिल अर्जदार यांनी तपासुन अचुक असल्याची खात्री करणे आवश्यक आहे. जर त्यामध्ये काही चुक आढळुन आल्यास ऑन लाईन अर्जामध्ये दुरुस्ती करावी किंवा सदरचा ऑनलाईन अर्ज शासनास शुल्क प्रदान करण्यापुर्वी संबंधित वापरकर्ता रद्द करु शकेल. त्यानंतर ऑनलाईन शुल्काचा भरणा नेटबँकिंग/डेबीटकार्ड किंवा एन.इ.एफ.टी व्दारे (प्रस्तावित) करावा. ईएसबीटीआर (e-SBTR) मध्ये भरणा केल्याबाबतचा पुरावा म्हणुन (proof of payment ) पावतीची प्रिंट काढावी व संबंधित बँकेच्या शाखेत जावून प्रदानाची प्रत सादर केल्यानंतर ई-एसबीटीआर (e-SBTR) प्राप्त करुन घ्यावा. सदरची ईएसबीटीआर (e-SBTR) ची प्रत नोंदणीकरीता सादर करावयाच्या दस्ताच्या प्रथम पृष्ठावर जोडण्यात यावी . ( महाराष्ट्र मुद्रांक अधिनियम १९५८ चे कलम १३ नुसार तेथुनच दस्त लिहिण्यास प्रारंभ करावा.)
(ई-एसबीटीआर (e-SBTR) प्राप्त झाल्यानंतर काही चुक झाल्याचे निदर्शनास आल्यास मुद्रांक शुल्क परतावा साठीच्या पध्दतीचा अवलंब करावा लागेल याची कृपया नोंद घ्यावी.)

**(४.३.२ ) बँकेच्या काऊंटरवर ऑफ लाईन पध्दतीने ई-एसबीटीआर (e-SBTR) व्दारे** शुल्क प्रदान **करण्यासाठीची कार्यपध्दती :-** ( जोडतक्ता क्रमांक-VI प्रमाणे )

ई-एसबीटीआर (e-SBTR) व्दारे शुल्क प्रदान करण्यासाठी नेमण्यात आलेल्या प्राधिकृत सहभागी बॅकेच्या शाखेत ई-एसबीटीआर मिळण्यासाठीचा अर्ज संपूर्ण माहिती भरून सादर करावा. माहिती ऑनलाईन भरण्याचे काम संबंधित बॅके मार्फत होईल. त्यानंतर रोखीने, धनादेश किंवा धनाकर्षाने शुल्क प्रदान करावे. ई-एसबीटीआर ची प्रत बॅकेकडून प्राप्त करून घ्यावी. सदरची ई-एसबीटीआर प्रत नोंदणी करीता सादर करावयाच्या दस्ताच्या प्रथम पृष्ठावर जोडण्यात यावी. ( महाराष्ट्र मुद्रांक अधिनियम १९५८ चे कलम १३ नुसार तेथुनच दस्त लिहिण्यास प्रारंभ करावा.)
(ई-एसबीटीआर (e-SBTR) प्राप्त झाल्यानंतर काही चुक झाल्याचे निदर्शनास आल्यास मुद्रांक शुल्क परतावा साठीच्या पध्दतीचा अवलंब करावा लागेल यांची कृपया नोंद घ्यावी.)

**(५) दुय्यम निबंधक स्तरावर करावयाची कार्यवाही :-** याप्रमाणे ई-भरणा (ई-पेमेंट) व ई-एसबीटीआर (e-SBTR) व्दारे मुद्रांकित दस्तऐवज नोंदणीसाठी आल्यावर दुय्यम निबंधक यांनी पुढील प्रमाणे दोन भागात कार्यवाही करावी.

**(५.१) ई -भरण्याची पडताळणी ( Verification )** (नियम क्रमांक १३ क पहा).

( ५.१.१ ) या नियमामध्ये सविस्तररित्या नमुद केल्याप्रमाणे साधी पावती /ईएसबीटीआर (e-SBTR) ची प्रत दस्तास योग्यरित्या जोडली आहे याची खात्री करावी.

(५.१.२) साधी पावती / ईएसबीटीआर (e-SBTR) मधील नमुद दस्तविषयक तपशिल आणि दस्तातील तपशिल सर्व साधारणपणे जुळत असल्याची खातरजमा करावी.

(५.१.३) ई-भरणा (ई-पेमेंट) करताना बँकेव्दारे देण्यात आलेला चलन ओळख क्रमांक CIN ची तारीख व आभासी कोषागाराने दिलेला शासकिय संदर्भ क्रमांक GRN ची तारीख यापैकी जी नंतरची असलेली ती तारीख मुद्रांकाच्या खरेदीची तारीख म्हणुन समजण्यात येईल. सदरच्या खरेदी तारखेनंतर त्याची वैधता ही सहा महीने असेल.

(५.१.४) दस्त आय-सरिता प्रणालीव्दारे नोंदविताना प्रदानांचा तपशिलामध्ये "Payment Details" खात्री करण्यासाठी ("Verify") हा पर्याय उपलब्ध आहे, त्याचा वापर करुन, सदर प्रदानांची पडताळणी करावी.

**(५.२) ई- भरणा विरूपित करणे (Defacement )**( नियम क्रमांक १३ ख पहा).

(५.२.१ ) ई-भरणा पध्दतीव्दारे अदा केलेले प्रदान असलेला दस्त आय सरिता प्रणालीमध्ये नोंदविताना सदरचे प्रदान हे आय सरिता प्रणालीव्दारे शिक्का क्रमांक २ च्या वेळी आपोआप विरुपित होईल. (will be automatically defaced by the iSARITA at stamp-2 )

(५.२.२) उक्त प्रदान आपोआप विरूपित झाल्यानंतर विरुपित चलन दिसेल. त्याची छापिल प्रत घेता येईल.

(५.२.३) जर विरुपित चलन आले नाही तर अधिकची काळजी म्हणुन अहवाल भागातील विकल्प (report module option) वापरुन तेथील यादीमध्ये आपल्या समोर आलेला शासकिय संदर्भ क्रमांक विरूपित झाल्याची खात्री करावी आणि त्याची छापील प्रत घ्यावी.

(५.२.४) उक्त प्रदान आपोआप विरूपित झाल्यास ग्रास प्रणालीव्दारे चलन विरुपित झाल्याचा क्रमांक (Defacement number ) नमूद करून तसा शेरा दस्तावर सर्व नोंदणी अधिका-यांनी नमुद करणे आवश्यक आहे.

(५.२.५) अडचणीच्या वेळी इंटरनेटव्दारे (ग्रास) प्रणाली मधुन नोंदणी अधिका-याने त्याचा user id व Passwoard वापरून चलन विरुपित झाल्याची खात्री करावी / विरूपित करावे. असा प्रकरणात विरूपित चलनाची प्रिंन्ट काढून दस्ताला जोडावी.

(५.२.६) तसेच नोंदणी अधिकारी / मुद्रांक जिल्हाधिकारी हे संबधित बँकेच्या शाखेमध्ये ई-एसबीटीआर/ साधी पावती निर्गमित केल्याबाबत दुरध्वनी वरुन देखिल चौकशी करुन खात्री करु शकतात.

(५.२.७) मुद्रांक जिल्हाधिकारी यांनी अभिनिर्णय करून दस्त प्रमाणित करताना ई-भरणा पध्दतीने मुद्रांक शुल्क अदा केलेले असल्यास वरील परिच्छेद क्रमांक ५.२.५ प्रमाणे कार्यवाही करावी.

(५.३) ई-भरणा (ई-पेमेंट) संबंधी उर्वरीत तरतूदी महाराष्ट्र मुद्रांक शुल्काचा ई-भरणा (ई-पेमेंट) व परतावा नियम २०१३ मध्ये नमुद करण्यात आल्या आहेत, त्याची प्रत सर्व अधिका-यांना ऑगस्ट २०१३ मध्ये झालेल्या विभागीय कार्यशाळेमध्ये देण्यात आलेली आहे. तसेच सदर नियमांची प्रत विभागाचे संकेतस्थळ www.igrmaharashtra.gov.in वर देखील उपलब्ध आहे. तरी सदर सुचनांचे काटेकोरपणे पालन करावे.

वर नमुद पध्दतीमध्ये विश्लेषण केल्याप्रमाणे सर्व दुय्यम निबंधक/सह दुय्यम निबंधक/सह जिल्हा निबंधक तथा मुद्रांक जिल्हाधिकारी यांनी ई-भरणा (ई-पेमेंट) पध्दतीचा अधिकाधिक वापर होण्याच्या दृष्टीने सर्वतोपरी कार्यवाही करावी.

**ई-भरणा केल्यानंतर प्राप्त होणारे जी.आर.एन. क्रमाक त्यामधील शेवटच्या अक्षरानुसार चार प्रकारचे असतील:-**
**E- ऑन लाईन पध्दतीने प्राप्त केलेले ई-चलन, M- काऊंटर पध्दतीने प्राप्त केलेले ई-चलन, R- साधी पावती ,**
**S- ई-एस.बी.टी.आर.**

**(६) सर्वसाधारण सुचना :-**

ई-भरणा (ई-पेमेंट) पध्दतीला सर्वसामान्य लोकांपर्यंत पोहचविण्यासाठी खालील मार्गदर्शक तत्वांचा अवलंब करावा.

(६.१) नोंदणी कार्यालयात नियमित येणारा वकील वर्ग, नोंदणी कार्यालयाच्या परिसरात व शहरात असलेल्या बँकांचे सर्व शाखाधिकारी, बांधकाम व्यवसायिक, मुद्रांक विक्रेते व दस्तलेखनिक करणारे या सर्व संबंधितांची बैठक घेऊन त्यांना सविस्तर माहीती पुरवावी व या प्रणालीचे महत्व त्यांना पटवुन द्यावे.

(६.२) कार्यालयाच्या बाहेर ई-भरणा (ई-पेमेंट) ची सुचना सर्वांना ठळक दिसेल व समजेल अशा अक्षरामध्ये लावावी. तसेच या कार्यालयाकडुन पुरविण्यात आलेले ई-भरणा (ई-पेमेंट) व e-SBTR बाबत घडी पत्रिका, सर्वांना माहीतीसाठी द्याव्यात. तसेच नोंदणी उपमहानिरीक्षक व सह जिल्हानिबंधक हे त्यांच्या स्तरावर कार्यालयीन खर्चाच्या अनुदानातून जास्तीत घडिपत्रिका आवश्यकतेप्रमाणे छापून घेऊ शकतात.

(६.३) या परिपत्रका सोबत देण्यात आलेले नमुना **'अ' 'ब' व 'क'** मधील फलक सर्व नोंदणी व प्रशासकीय कार्यालयांच्या ठिकाणी ९०x६० से.मी.या आकारामध्ये तात्काळ प्रदर्शित करावेत.

(६.४) राज्याच्या साधन संपत्तीमध्ये वाढ होण्याच्या व हिताच्या दृष्टीकोणातुन आपल्या कार्यालयाच्या परिसरातील एखाद्या बँकेने आपल्या कार्यालयाच्या आवारात जर बँक काउंटर उघडण्याबद्दल इच्छा दाखविल्यास सदरचा प्रस्ताव मंजुरीसाठी या कार्यालयाकडे सादर करावा. शासनाने या धोरणास मंजुरी दिली आहे.

(६.५) ऑक्टोबर २०१३ पासुन मुद्रांक शुल्क, नोंदणी फी व इतर रक्कमांचा भरणा हा ई-भरणा (ई-पेमेंट) व ई.एस.बी.टी.आर (e-SBTR) या प्रणालीव्दारेच करण्यासाठी उच्च प्राधान्य देण्यात यावे. तसेच इतर सर्व मार्गानी होत असलेलली प्रदाने बंद करण्यात येणार असल्याने मोठया रक्कमेच्या मुद्रांक शुल्काबाबतचा भरणा ऑक्टोबर अखेर २५% व नोव्हेंबर अखेर ५०% डिसेंबर अखेर ७५% व जानेवारी अखेर पर्यंत १००% भरणा वरील प्रणालीव्दारे करण्यात येईल याची दक्षता घ्यावी.

(६.६) या कार्यालयाकडे झालेल्या विचारणेवरुन स्पष्ट करण्यात येते कि, नोंदणी कार्यालयात व मुद्रांक जिल्हाधिकारी कार्यालयात नियमित येणा-या पक्षकारांनी अथवा वकील वर्गाने प्राधिकृत केलेल्या बँकेमध्ये मुद्रांक शुल्क व नोंदणी फी भरण्यासाठी खाते उघडल्यास त्यांना ई-पेमेंटव्दारे भरणा करणे अधिक सुलभ होईल.

(६.७) वरील प्रमाणे ज्या दुय्यम निबंधक कार्यालयाकडुन ई.एस.बी.टी.आर (e-SBTR) व ई-भरणा (ई-पेमेंट) याव्दारे नोंदणी होणा-या दस्तासाठी जास्तीत जास्त मुद्रांक शुल्क, नोंदणी फी व इतर रकमा या पध्दतीने जमा करण्यात येईल त्या दुय्यम निबंधकांच्या गोपनिय अहवालामध्ये याबाबत प्रतिवेदन अधिका-यांनी विशेष नोंद करावी. तसेच ई-भरणा (ई-पेमेंट) प्रणालीतील फायद्यांची माहीती सर्व संबंधितांना करुन द्यावी.

ई.एस.बी.टी.आर (ई-सुरक्षित (प्रतिभूति) बँक तथा कोषागार पावती) व ई-भरणा (ई-पेमेंट) यामध्ये काही अडचणी आल्यास नोंदणी उपमहानिरिक्षक / मुद्रांक जिल्हाधिकारी यांनी त्यांच्या विभागीय / जिल्हा

स्तरावर बँक मॅनेजर्स व दुय्यम निबंधक यांच्या बैठका घेऊन तात्काळ निवारण करावे व प्राधान्याने अडचणींचा निपटारा करावा.

या विभागाने व्यापक जनहीत व सर्वसामान्य माणुस केंद्रबिंदु धरुन आणि राष्ट्रहिताच्या दृष्टीकोणातून आधुनिक तंत्रज्ञानाचा उपयोग करुन ही प्रणाली विकसित करण्यात आली आहे. तरी सर्व नोंदणी अधिका-यांनी, जिल्हा स्तरावरील अधिका-यांनी ही नविन संकल्पना राज्यांच्या आर्थिक विकासाच्या दृष्टीकोनातून लोकाभिमुख करण्यासाठी सर्व सामान्य जनते पर्यंत पोहचवावी.

Sethuraman Chockalingam Cho

Digitally signed by Sethuraman Chockalingam Cho
DN: c=IN, o=Govt of Maharashtra, ou=Stamp and Registration, postalCode=411001, st=Maharashtra, cn=Sethuraman Chockalingam Cho
Date: 2013.10.06 13:06:01 +05'30'

*(एस. चोक्कलिंगम् )*
**नोंदणी महानिरिक्षक व मुद्रांक नियंत्रक,**
**महाराष्ट्र राज्य,पुणे**

## नमुना अ

## ई-भरणा पध्दतीचे फायदे

१) ई-भरणा पद्दतीव्दारे केव्हाही कोठुनही २४x७ ग्रास प्रणाली अथवा शासनाने प्रधिकृत केलेल्या बँकाव्दारे मुद्रांक शुल्क, नोंदणी शुल्क अथवा इतर रकमांचा भरणा शासनास जमा करता येणार आहे.

२) ई-भरणा पध्दतीत अंतर्भूत असलेल्या ई.एस.बी.टी.आर. चा कागद हा परंपरागत मुद्रांक कागद सदृश्य आहे.

३) ई-भरणा पध्दतीत मुद्रांक शुल्काचा परतावा देण्यासाठी वजावटीची रक्कम ही परंपरागत मुद्रांक परतावा पध्दतीच्या १०% वजावटीच्या रकमेशी तुलना करता खूपच कमी म्हणजे मुद्रांक शुल्काच्या १%, कमीत कमी रु. २००/- व जास्तीत जास्त रु.१०००/- या मर्यादेच्या अधिन राहील.

४) ई-भरणा पद्दतीव्दारे शासनास जमा होणा-या रकमेचा ताळमेळ महालेखापाल कार्यालय तसेच इतर सर्व कार्यालया बरोबर घेणे अतिशय सुलभ व सोयीस्कर होणार आहे.

<table>
<tr><th colspan="6">नमुना ब</th></tr>
<tr><th colspan="6">मुद्रांक शुल्क, नोंदणी फी व इतर रक्कमा ई-भरणा(ई-पेमेंट) पध्दतीने भरणेबाबत माहीती</th></tr>
<tr><th colspan="4">साधी पावती (ई-चलन )</th><th colspan="2">ई-एस.बी.टी.आर.</th></tr>
<tr><th colspan="2">ऑनलाईन</th><th colspan="2">ऑफ लाईन</th><th>ऑनलाईन भरणा</th><th>ऑफ लाईन भरणा</th></tr>
<tr><td>ग्रास प्रणालीच्या संकेतस्थळाव्दारे प्राप्त करता येईल</td><td>मान्यताप्राप्त बँकेच्या संकेतस्थळाव्दारे प्राप्त करता येईल</td><td>ग्रास प्रणालीच्या संकेतस्थळाव्दारे बँकेच्या काऊटर वर शुल्क प्रदान करता येईल</td><td>मान्यताप्राप्त बँकेच्या संकेतस्थळाव्दारे तसेच बँकेच्या कांऊटर वरून शुल्क प्रदान करता येईल</td><td>प्राधिकृत सहभागी बँकाच्या संकेतस्थळाव्दारे शुल्क प्रदान करता येईल</td><td>प्राधिकृत सहभागी बँकाच्या शाखा मार्फत काऊटरवर जाऊन शुल्क प्रदान करता येईल.</td></tr>
<tr><td colspan="2">शुल्क प्रदान नेट बँकिंग/ डेबीटकार्ड किंवा एन.ई एफ.टी. ( प्रस्तावित)</td><td colspan="2">शुल्क प्रदान रोख / चेक / ड्राफ्टव्दारे</td><td>शुल्क प्रदान नेट बँकिंग / डेबीटकार्ड किंवा एन.ई एफ.टी (प्रस्तावित)</td><td>शुल्क प्रदान रोख / चेक / ड्राफ्टव्दारे</td></tr>
<tr><td colspan="2">साध्या कागदावर स्वतः प्रिंट घेऊन साक्षांकन करून दस्त नोंदणी साठी साधी पावती सादर करता येते.</td><td colspan="2">साध्या कागदावर बँकेमार्फत प्रिंट घेऊन बँक अधिका-याने साक्षांकन करून दस्त नोंदणी साठी साधी पावती सादर करता येते.</td><td colspan="2">शासनाने पुरविलेल्या विशेष स्टेशनरीवर प्राधिकृत सह भागी बँका मार्फत प्राप्त करून घेता येईल</td></tr>
</table>

## नमुना क

## साधी पावती (ई-चलन) व ई-एस.बी.टी.आर. यांची ठळक वैशिष्ट्ये

| अ,क्र. | साधी पावती /ई-चलन | ई-एसबीटीआर( e-SBTR) |
|---|---|---|
| १. | साध्या कागदावर प्रिंट होईल. | सुरक्षा वैशिष्टयांनी युक्त (पारंपारिक मुद्रांक सदृश्य) स्टेशनरीवर प्रिंट होईल. |
| २. | प्रदान कर्त्यास स्वतः प्रिंट घेता येईल किंवा बँकेच्या काउंटरवर पैसे भरुन प्रिंट घेता येईल. | फक्त प्राधिकृत सहभागी बँका प्रिंट करुन देवु शकतील. |
| ३. | जे दस्त नोंदणी करणे अनिवार्य आहेत, त्या दस्तांसाठीच मुद्रांक शुल्क व कोणत्याही दस्ताचे नोंदणी फी तसेच इतर रकमांचा भरणा करता येईल. | जे दस्त नोंदविणे कायद्याने अनिवार्य आहे असे दस्त नोंदविणे कायद्याने वैकल्पिक आहे अशा कोणत्याही दस्ताचे रु. ५०००/- व त्यापेक्षा जास्तीचे मुद्रांक शुल्क भरता येईल. |
| ४. | नोंदणी करावयाच्या दस्तास मुद्रांक शुल्काबरोबरच नोंदणी फी व इतर रकमांचा भरणा एकत्रितपणे करता येईल. तसेच केवळ नोंदणी फी देखील स्वतंत्र्यरित्या भरता येईल. | नोंदणी करावयाच्या दस्तास मुद्रांक शुल्का बरोबरच नोंदणी फी व इतर रकमांचा भरणा सुध्दा अदा करता येईल. मात्र केवळ नोंदणी फी स्वतंत्र्यरित्या भरता येणार नाही. |
| ५. | या मध्ये प्रदानकर्ता स्वतः प्रिंट घेऊन व स्वतः साक्षांकन करुन दस्त नोंदणीसाठी वापरु शकेल. | फक्त प्राधिकृत केलेल्या बँकेमार्फतच या बाबतची प्रिंट घेण्यात येईल व त्यावर बँकेचा अधिकारी स्वाक्षरी करील. |
| ६ | या व्दारे मुद्रांक शुल्क, नोंदणी फी व इतर रकमांचा भरणा ऑन लाईन पध्दतीने केल्यास कोणत्याही रक्कमे साठी करता येईल व काऊटर पध्दतीने भरणा केल्यास रू. ३००/- व त्या वरील रकमेसाठीच करता येईल. | या व्दारे मुद्रांक शुल्क, नोंदणी फी व इतर रकमांचा भरणा रू. ५०००/- व त्या वरील रकमांसाठी करता येईल. |

**Annexure-I**

## Payment of Stamp Duty & Registration Fees through GRAS - *Online* Mode

Visit GRAS website
https://gras.mahakosh.gov.in

↓

Click 'Pay without Registration'
(Register yourself if you are a regular user)

↓

Select payment mode as 'e-payment'

↓

Select Dept. name as
'Inspector General of Registration'

↓

Select payment type as 'Non-Judicial Stamp Duty Customer Payment and/or Registration Fees

↓

Select applicable Scheme Name

↓

Select applicable 'District'

↓

Select applicable 'Office Name' where you want to visit.
(Receipt can be used anywhere in concurrent jurisdiction)

↓

Select applicable 'Period (Year)'
as current financial year

↓

Select 'One Time/Adhoc' in next
selection box

↓

Enter Payment amount in
'Amount'

↓

Select applicable 'Article Code'

Enter party details, one from each side. For more people, simply write +2, +3, etc. along with first name. Enter details of property in transaction

Select 'Bank' through which payment would be done

Challan would be generated in MTR Form Number 6

Verify the details of challan

If details are correct, click on 'Proceed for Payment', otherwise click cancel and re-enter details

Note the GRN displayed on screen and then click 'OK'

Selected bank's website will open

Enter login id and password of bank

Confirm Payment

Final eChallan would be generated

Print and sign it

Attach e-challan to document

Visit SRO

Annexure-II

## Payment of Stamp Duty & Registration Fees through Bank Simple Receipt - *Online* Mode

Visit Bank website (Eg. https://etax.idbibank.co.in/IGR)

↓

Select mode of payment as 'Online' and type of receipt as 'Simple Receipt'

↓

Read instructions mentioned carefully and accept the same by ticking checkbox & pressing the button submit

↓

Fill Simple Receipt Payment Input form

↓

Submit Form

↓

If all the details entered are valid, user will be asked to confirm and proceed

↓

Select one of the applicable internet banking account - Corporate Net-banking or Retail Net-banking

↓

Confirm Payment

↓

Simple Receipt will be generated

↓

Print it

↓

Attach simple receipt to the first page of original document

↓

Visit SRO

Annexure-III

## Payment of Stamp Duty & Registration Fees through GRAS - Payment A Over the Counter (OTC) Mode

Visit GRAS website
https://gras.mahakosh.gov.in

↓

Click 'Pay without Registration'
(Register yourself if you are a regular user)

↓

Select payment mode as 'Payment Across Bank Counter'

↓

Select Dept. name as
'Inspector General of Registration'

↓

Select payment type as 'Non-Judicial Stamp Duty Customer Payment and/or Registration Fees

↓

Select applicable Scheme Name

↓

Select applicable 'District'

↓

Select applicable 'Office Name' where you want to visit.
(Receipt can be used anywhere in concurrent jurisdiction)

↓

Select applicable 'Period (Year)'
as current financial year

↓


Select 'One Time/Adhoc' in next selection box

↓

Enter Payment amount in
'Amount'

↓

Annexure III Contd.



**Annexure-IV**

## Payment of Stamp Duty & Registration Fees through Simple Receipt – Over the Counter (OTC) Mode

Visit Bank website (Eg. https://etax.idbibank.co.in/IGR)

↓

Select mode of payment as 'Over the Counter' and type of receipt as 'Simple Receipt'

↓

Select convenient branch of Bank

↓

Select type of instrument for payment as DD or Cheque or Cash

↓

Enter payment amount in field 'Instrument amount'

↓

Enter payment instrument number (e.g. cheque number)

↓

Enter instrument date

↓

Enter payment instrument issuing Bank's name

↓

Enter issuing Branch Name

↓


Read instructions mentioned carefully and accept the same by ticking checkbox & pressing the button submit

↓

Fill Simple Receipt Payment Input form


↓

Annexure IV – Contd



## Annexure-V

# Payment of Stamp Duty & Registration Fees through eSBTR - *Online* Mode



**Annexure-VI**

## Payment of Stamp Duty & Registration Fees through eSBTR – Over the Counter (OTC) Mode

